आर.सी.एस. नं.२६/२०१८

<u>नि. ३३ खाली आदेश</u>

१. सदर वादीने नि.क्र ३० वर मे. न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाप्रमाणे दाव्यात दुरुस्त करण्यास परवानगी मिळावी व सदर १४ दिवसाचा कालावधी वाढवुन वादी यांना दावा दुरुस्त प्रत दाखल करणेस परवानगी मिळणे बाबत दाखल केलेला आहे.

२. वादीचे म्हणणे असे की, वादी यांनी सदरील दावा हा वाटप व ठरावा करिता दाखल केलेला आहे. वादी यांचे कायम निवास स्थान हे रा. बेटवाडी ता.दौंड, जि.पुणे असुन त्यांचे वय ७६ वर्ष आहे. वादी यांचे वय पाहता त्यांना संधिवात व इतर व्याधीमुळे प्रत्येक तारखेस प्रवास करणे शक्य होत नाही. वादी यांचे तत्कालीन वकिलांनी दि.११/११/२०२१ रोजी प्रतिवादी श्री जगन्नाथ साहेबराव कोंडे यांचा मृत्यु दि.०२/१०/२०२० झालेला असुन त्यांचे कायदेशीर वारसांची नोंद दाव्याकामी करण्यासाठीचे अर्ज दाखल केला होता व आहे सदरील अर्जावर दि.१०/१२/२०२२ रोजी मे.कोर्टाने सदरील अर्जावर हुकुम केलेला आहे व सदरील हुकुमाप्रमाणे वादी यांना कायदेशीर वारस रेकॉर्डवर १४ दिवसाचे आत घेण्यास व सुधारित प्रत दाखल करण्यास विलंब झाला आहे. सदर विलंब कोरोना महामारी मुळे सर्वत्र टाळेबंदी होती त्यामुळे वादीस त्यांचे वकिलांना भेटुन माहिती देता आली नाही त्यामुळे झालेला आहे. तरी सदर विलंब माफ करुन प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी नि.क्र ३३ चे अर्जावर म्हणणे दिलेले आहे. प्रतिवादीचे म्हणणे असे की, वादी यांनी सदर अर्जामध्ये नमुद केलेला मजकुर प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाही. अर्जात नमुद केलेला मजकुर खोटा व बनावट स्वरुपाचा आहे. कलम ४ मध्ये नमुद केले आहे की, वादीचे भोर येथे येणे होत नाही. तसेच वादीस तांत्रीक बाबीची माहीती नाही. तसेच कोरोना महामारीनंतर जानेवारी २०२२ पासुन नियमित कोर्ट चालु झाले आहे. तसेच कलम ६ ते ८ मध्ये नमुद केलेला मजकुर चुकीचा आहे व केवळ अर्ज मंजुर करण्याकरिता दिलेल्या सबबी आहेत. वरील सर्व कारणांचा विचार करुन सदरील अर्ज खर्चासह रददबातील करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४.	वादी व प्रतिवादींचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, नि.क्र ३० चे अर्जावरील आदेशाप्रमाणे वादीस प्रतिवादी जगन्नाथ साहेबराव कोंडे यांचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी दि.१०/१२/२०२० रोजी देण्यात आली होती व त्याप्रमाणे १४ दिवसामध्ये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यात यावे असे आदेशीत केले होते.परंतु वादीने त्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती केलेली नाही.

५.	प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुतची दुरुस्ती करण्यास बराच विलंब झालेला आहे. परंतु दाव्याचे स्वरुप ध्यानात घेता वादीने नमूद केलेली कारणे सदर दावा दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करण्यायोग्य आहेत. सदरचा दावा दुरुस्ती प्रत दाखल न केल्यास वादीचे नुकसान होण्याची शक्यता आहे. तसेच सदर दावा दुरुस्ती प्रत दाव्यात सामील केल्यास व दावा दुरुस्त प्रत दाखल केल्यास सदरचा दावा गुणदोषावर चालविण्यास मदत होणार आहे. वादीने सदर दावा दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करण्याबाबत नमुद केलेली कारणे समाधानकारक व संयुक्तीक आहेत. तसेच सदर दावा वाटपाचा असल्याने प्रतिवादींच्या वारसांना दाव्यात दुरुस्ती करुन सामील करणे आवश्यक आहे. वादीस प्रस्तुत दावा दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करणेस बराच विलंब झालेला आहे. त्यामुळे वादी वादखर्च देण्यास पात्र आहे. वरील सर्वबाबी व परिस्थितींचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. त्याप्रमाणे खालील आदेश पारित करण्यात येतो:

<u>आदेश</u>

१.	अर्ज (नि.३३ ) मंजूर करण्यात आला.

२.	वादीने वादखर्च रक्कम रु.१००/- प्रतिवादींना द्यावी.

३.	वादीस १ महिनाच्या कालावधीमध्ये दावा दुरुस्त प्रत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

(ह.उ.उ.पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश, भोर

दिनांक :१६/०८/२०२२